**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 6** **July-Aug 2024**

# कादंबरी: समाजबदलाचे प्रतिबिंब अधोरेखित करणारा वाङ्मयप्रकार

**प्रा. डॉ.राजेंद्र रामनाथ गायकवाड**
मराठी विभागप्रमुख.
लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे ता.संगमनेर, जि.अ.नगर
**Corresponding Author: प्रा. डॉ.राजेंद्र रामनाथ गायकवाड**
**DOI- 10.5281/zenodo.13382860**

**प्रास्ताविक:**

कादंबरी: समाजबदलाचे प्रतिबिंब अधोरेखित करणारा वाङ्मयप्रकार घोशवारा कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतर चालणारा व वाढणारा वाङ्मयप्रकार आहे. व्यक्तींचे जीवन समाजप्रवाहाशी जुळवत, टक्कर देत जगत असते. या जगण्याच्या धडपडीत ते उरलेल्या समाजाशी विविध स्थळी व विविध काळी अनेक नात्यांनी बांधले जात असते. यामुळे मानवी जीवनाला बाहयांगानेसुध्दा आपोआपच गुंतागुत प्राप्त होते. समाजाचे जीवन आणि काळ हे दोन्ही गतिमान असतात. दर काळात समाजजीवनात छोटयामोठया गोष्टी घडतात. संवेदनशील कलावंत या गोष्टी ची नोंद घेऊन त्यांना हाताळतो व कादंबरीत त्यांच प्रतिबिंब पडत असते. हे प्रतिबिंब म्हणजेच वातावरण असते. मानवी जीवनाच्या अंतर्बाहय गुंतागुंतीचा आपण जर उल्लेख केलाच. ही गुंतागुंत उकलणे हा कलावंताचा प्रतिभाधर्म असतो. पण ही गुंतागुंत तो मानवी व्यक्तीच्या जगण्याच्या संदर्भातच उकलू शकतो.
बीजशब्द:- कादंबरी, वातावरण, कथानक, निवेदन, भाषाविचार, पात्रविचार, घटना, आशय सुत्रे.

कादंबरीतील कथानक हे कुठल्यातरी वातावरणात घडते. हे वातावरण आभ्यासात्मक असते. म्हणजे खरे असल्याचा भास निर्माण केलेला असतो. कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतरपणे चालणारा वाङ्मयप्रकार असल्यामुळे स्वाभाविक त्याचा आवाका मोठा आहे. परिणामतः समाज, त्यातील व्यक्ती, त्यांचे जीवन या साऱ्याचे संबंधासह जगणे कादंबरीत येते. कादंबरीकार ह सर्व आवाका लक्षात घेऊन त्याच्या परीनें जीवनदर्शन घडवण्याचा प्रयत्न करीत असतो. जीवनाला बाहय व आंतरिक असे दोन्ही संदर्भ असतात. बाहय संदर्भात, मानवी संबंध विविध स्थळे व काळ यांच्याशी निगडित असतात. आंतरिक संबंधात व्यक्ती तिचे समग्र परंपरेतले, समाज व्यवस्थेतले स्थान यांचा तीव्रपणे विचार करते.

**संषोधनाची उदिदश्टये:**

१. कादंबरी साहित्यप्रकार स्पष्ट करणे.

२. कादंबरीतून समाजबदलाचे प्रतिबिंब स्पष्ट करणे.

**संशोधनाचे महत्व:**

१. कादंबरीमुळे समाजातील विविध समस्या समजतात.

२. कादंबरीतील पात्रांची ओळख होते.

३. कादंबरीमुळे साहित्याची प्रगल्भता वाढते.

४. कादंबरीमुळे समाजबदलाचे प्रतिबिंब दिसते.

**कादंबरी:** समाजबदलाचे प्रतिबिंब अधोरेखित करणारा वाङ्मयप्रकार कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्म साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत अनेक आशयसूत्रे असतात. पात्रांची गर्दी कादंबरीतल्या आशयाला नेमकेपणाने पेलण्यासाठी प्रस्तुतीकारणाच्या अनेक पध्दती वापराव्या लागतात.

विविध माध्यमांतून हे प्रस्तुतीकरण व्हावे लागते. निवेदन, वर्णन, संभाषण, स्वभाषण, भाष्य या प्रस्तुतीकरणपध्दती तर पत्र दैनंदिन ही माध्यमे. कादंबरी ही गदयातून प्रस्तुत होत असूनही ती काव्यात्म होऊ शकते. तसेच गदयशैलीचा लवचीकपणे वापर करुन बाहय व अंतर मनोविश्लेषनाचा समर्थपणे व्यक्त करु शकते. महात्मा फुले यांच्यानंतरचे महत्वाचे लेखक म्हणजे कृष्णराव भालेकर. त्यांनी महात्मा फुल्यांपासून प्रेरणा घेऊन कादंबरी व काव्यलेखन केलेले आहे. त्यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी १८७७ मध्ये 'दीनबंधू' या नियतकालिकामधून प्रकाशित झाली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी १८७७ मध्ये 'दीनबंधू' या नियतकालिकामधून प्रकाशित झाली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही कादंबरी चर्चात्मक स्वरुपाची आहे. गावातील पाटील हा महार, मारवाडी, मुसलमान, ब्राम्हण या व इतर सर्व जातींच्या लोकांची बैठक बोलावतो. या व इतर सर्व जातींच्या लोकांची बैठक बोलावतो. या बैठकीत शेतकऱ्यांचे धर्माच्या आधारे होणारे शोषण, कुलकर्ण्याकडून होणारी आर्थिक लुबाडणुक, कष्ट करुनही उपासमार, जातीव्यवस्था यासारख्या विषयांवर चर्चा होते, त्याचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. तंत्राच्या बाबतीत ही फसलेली कादंबरी आहे. मात्र ग्रामीण कादंबरी लेखनाचा प्रथम प्रयत्न म्हणून उल्लेखनीय अशी कादंबरी आहे.

बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिलीच वास्तववादी कादंबरी होय. 'यमुना

पर्यटन' प्रसिध्द झाल्यानंतरच पुनर्विवाहाची चळवळ सुरु झाली. हरी नारायण आपटे( १८६४-१९१९) यांना आधुनिक कादंबरीचे जनक मानले जाते. त्यांनी एकूण २१ कादंबऱ्या लिहिल्या. १८८६ साली रेनॉल्डस्च्या 'मिस्टीज ऑफ ओल्ड लंडन' च्या धर्तीवर लिहिलेली त्यांची 'मधली स्थिती' ही पहिली कादंबरी तर 'करमणूक' साप्ताहिकातून क्रमश: प्रसिध्द झालेली 'पण लक्षात कोण घेतो?' ही दुसरी कादंबरी. डॉ.. श्रीधर व्यंकटेश केतकर (१८८४-१९३७) यांनी 'गोंडवनातील प्रियवंदा', 'परांगदा',

'आशावादी, 'गावसासू', 'ब्राम्हण कन्या', 'विलक्षण' व 'भटक्या' अशा एकूण सात कादंबऱ्या लिहिल्या. विविध समाजसमूहांची अभिनव माहिती, मानवी मनाच्या काही अंगाची मर्मग्राही उकल व समाजसुधारणेसंबंधी विजेप्रमाणे धक्के देणारे क्रांतिकारक विचार यांनी त्या तुडुंब भरलेल्या आहेत. रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही तंत्रदृश्टया यशस्वी मानली गेलेली ग्रामीण कादंबरी १९०२ साली प्रकाशित झाली. पिराजी पाटील हा या कादंबरीचा नायक असून दुष्काळामुळे उदध्वस्त झालेल्या गावाची दुःस्थिती, शेतकरी व शेतकऱ्याच्या झालेल्या वाताहतीची हकीकत तो सांगतो, असे वर्णन या कादंबरीत आहे. दुष्काळात रोगराई, चोरीमारी, प्लेग यामुळे त्रासलेले शेतकरी ख्रिश्चन धर्म स्विकारतात. सरकारी अधिकारी लुबाडणुक करतात. शेतकरी शेतमजुर कष्टकरी उपाशी राहतात तर ब्राम्हण मात्र देवाधर्माच्या नावाने फसवणूक करुन पोटभर खातात, या सर्व गोष्टीविषयी चीड या कादंबरीत व्यक्त झालेली आहे.

'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' या कादंबऱ्या ग्रामीण साहित्याच्या पहिल्या कालखंडातील असून या कादंबऱ्याच्या आशयाचा अभ्यास केला असता त्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा, त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, या लेखनामागे फुले यांची प्रेरणा असलेली दिसून येते. यानंतर मुकुंदराव पाटील यांनी आपल्या 'दीनमित्र' या नियतकालिकातून कित्येक वर्श विविध प्रकारचे लेखन करुन ग्रामीण जीवनातील प्रश्नांना मुखर केले. त्यांच्या 'ढढ्ढाषास्त्री परान्ने' आणि 'होळीची पोळी' या कादंबऱ्या होय. १९२० ते १९७५ या कालखंडात ग. त्र्यं. माडखोलकर (चंदनवाडी), र. वा. दिघे (सराई, पाणकळा) वि.द. चिंदरकर (महापूर), ग. ल. ठोकळ (गावगुंड), रामतनय (मोहित्यांची मंजुळा, साखरगोष्टी, प्रमिलाबेन) वि. वा. हडप (गोदाराणी, अन्नदाता उपाशी) हे महत्वाचे कादंबरीकार आहेत. यापैकी माडखोलकर, हडप यांच्यावर गांधीवादाचा प्रभाव दिसून येतो. दिघे हे प्रादेशिक कादंबरीकार मानले जातात. तर 'गावगुंड' ही स्वातंत्र्य आंदोलनावर आधारलेली असून संघर्ष, योगायोग, प्रेम इत्यादी विषय असलेली रोमॅंटिक स्वरुपाची कादंबरी आहे. जयवंत दळवी १९२५-१९९४) यांची 'चक्र' ही त्यांची पहिली कादंबरी 'चक्र' मध्ये दळवीनीं झोपडपट्टी व तिथल्या माणसांचं जगणे चित्रित केलं आहे, पण या चित्रणाला केवळ छायाचित्रणाचा पाया नसून जीवनमूल्यांचे निराळेपण व त्यातून उद्भवणारा जीवनसंघर्ष यांची परिमाणे आहेत. कादंबऱ्या मध्ये बा.सी. मर्ढेकर यांच्या 'पाणी', 'तांबडी माती' या कादंबऱ्या मधून धरणामुळे उद्ध्वस्त झालेली गावे आलेली आहेत. श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२) या कादंबरीची निर्मिती दिवास्वप्नांच्या रंजक रुपांतरातून झाली. जीवनातील सामाजिक वास्तवाचे भान, चिंतनशीलता, जीवनाकडे बघण्याचा निश्चित दृष्टीकोन, इत्यादी चांगल्या कादंबरीचे अपरिहार्य गुण आढळून येत नाहीत. गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' (१९५५), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५७), 'माचीवरला बुधा' (१९५८) या कादंबऱ्या प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. विभावरी शिरुरकर यांची 'बळी'

(१९५०) ही ग्रामीण भागातील मांग-गारुडी या गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातीच्या उपेक्षित व दरिद्री जगण्याचे चित्रण करणारी अतिशय महत्वाची वास्तववादी स्वरुपाची कादंबरी आहे. व्यंकटेश माडगुळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४) या अतिशय महत्वाच्या कादंबऱ्या आहेत.

'बनगरवाडी' मधून एका खेडयातील धनगर समाजाचे शांत, संत असे जगणे, त्यांच्या रुढी-परंपरा, विविध स्वभाव, गावरीत, संस्कृती, सण-उत्सव इ. चे दर्शन घडते. वास्तववादी कादंबरीलेखनाला १९६० नंतर खऱ्या अर्थाने बहर आला. या कालखंडात ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्यांची पहिली पिढी तयार झाली. विविध स्तरातील या लेखकांनी खेडयातील जगण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असल्याने त्यांच्या कथा-कादंबऱ्या मधून संपूर्ण ग्रामीण जीवन, शेतकरी, शेतमजुर, बलुतेदार, दलित, भटके इत्यादी वर्ग, त्यांचे दारिद्रय, दुःख यासह साकार झालेले दिसून येते. उध्दव शेळके यांची 'धग' (१९६०), शंकर पाटील यांची 'टारफुला', आण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा', हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६८), माडगूळकर यांची 'वावटळ' (१९६४), ना. धों. महानोर यांची 'गांधारी'(१९७३), आनंद यादव यांची 'गोतावळा' व रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१), मनोहर तल्हार यांची 'माणूस' या वास्तववादी स्वरुपाच्या कादंबऱ्या आहेत. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' (१९७१) नटरंग, एकलकोंडा, माऊली, झोंबी, नांगरणी, घरभिंती, काचवेल या इतर कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. निसर्ग आणि माणूस तसेच प्राणिसृष्टीशी जे भावबंध जपले-जोपासले त्याचे कलात्मकतेने चित्रित केले आहे.

विश्वास पाटील यांची 'पानिपत' ही दुसरी कादंबरी. 'पांगिरा' ही पहिली कादंबरी. झाडाझडती, महानायक हया इतर कादंबऱ्या आहेत. 'पांगिरा' मध्ये त्यांनी ग्रामीण जीवनातील कारुण्य दर्शविले आहे.

सत्ता, संपत्ती, राजकारण, सहकार, संघटना, विश्वस्तनिती वगैरे जीवनक्षेत्रे ग्रामीण वास्तवात कोणती भूमिका निभावतात याचे सूक्ष्म व सखोल दर्शन 'पांगिरा' मधून घडते. १९७५ नंतर चंद्रकुमार नलगे, नागनाथ कोत्तापल्ले, उत्तम बंडू तुपे, भास्कर चंदनशीव (जांभळं ढव्ह), वासूदेव मुलाटे (विषवृक्षाच्या मुळया), बाबाराव मुसळे (हाल्या हाल्या दूध दे) असे कितीतरी लेखक ग्रामीण साहित्यात मोलाची भर घालताना तसेच ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांना वाचा फोडताना दिसून येतात. १९९० नंतरच्या काळात कादंबऱ्याचे लेखन आपणांस दिसून येते यात विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' (१९९०) ही कादंबरी धरणग्रस्तांच्या समस्येवर आधारलेली आहे. 'ताम्रपट' (१९९४)- रंगनाथ पठारे, 'कळप' (१९९१), 'धिगांणा' (१९९२), 'तणकट' (१९९८) राजन गवस, अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा', 'तहान' (१९९४), 'बारोमास' (२००२)- सदानंद देशमुख, कैलास दौंड - 'कापूसकाळ', 'तुडवण','पाणधुई', कृश्णात खोत-'गावठाण', बाबाराव मुसळे यांच्या 'पखाल' (१९९५), गणेश आपटे यांच्या 'गणगोत', 'चुकार', 'भिरुड' इत्यादी या कालखंडात काही स्त्री कादंबरीकारांनीही कादंबरीलेखन केलेले आहे. त्यात प्रतिमा इंगोले ('बुढाई', 'लळिताचे रंग' 'राहूकेतू', जिमखाना), वैशाली

कोल्हे,(अधांतरी), शुभदा मुंजे (वारुळ), मधु सावंत, अनुराधा गुरव या स्त्रीलेखिका ग्रामीण वास्तव आपल्या कादंबऱ्यामधून रेखाटताना दिसून येतात. 'नामुष्कीचे स्वगत' (१९९९) ही रंगनाथ पठारे यांची कादंबरी कादंबरीच्या पारंपारिक रचनातत्वाशी नाते मोडून आपला स्वतंत्र घाट सिध्द करते.

'नामुष्कीचे स्वगत' ही रंगनाथ पठारे यांची उत्तर-आधुनिक कादंबरी आहे. या कादंबरीत कॉर्पोरेट कल्चरचं अस्तित्व, माहितीचे होणारे स्फोट, क्लोन्सचे प्रयोग, जनुकीय शोधांनी उडवून दिलेला गोंधळ, व्यवस्था व्यूहांना मिळालेलं आव्हान, सर्जनता-नैतिकता-सुरतभाव यांच्या परस्परसंबंधाच्या आकलनातील घोळ, दरिद्रयातील जंतुघ्न जीवन, शोषण आणि विद्रोह यांच्या सहअस्तिवानं निर्माण केलेला प्रश्न, भांडवलशाही तंत्रज्ञानानं निर्माण केलेल्या कृत्रिम गरजा, त्या सतत वाढत राहव्यात यासाठी केलेला प्रसारमाध्यमांचा उपयोग असं हे बिनचेहऱ्याचं पण संवेद्य वास्तव आहे. ते पंचेद्रियांना स्पर्श करतं, पण त्यातून निर्माण होणाऱ्या जाणिवांना स्थिर होऊ देत नाही. असं वास्तव नवकादंबरीच्या कादंबरीला, तिच्या घाटाला धडक देत असतं.

**निष्कर्ष**:

कादंबरी हा दीर्घ असा वाड्मयप्रकार आहे. कादंबरीत लेखकाला आपला कथाविषय सविस्तरपणे जीवनातील विविध अंगांना, वास्तवाला सामावून घेत, एक व्यापक असा जीवनपट उभा करता येतो. हे कादंबरी वाड्मयाचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. १९९० नंतरचे वास्तवही अतिशय गुंतागुंतीचे बनलेले असून त्याचे आकलन सर्वसामान्यांना होऊ शकत नसल्याने त्यांच्यासमोर असंख्य समस्या आ वासून उभ्या आहेत व त्यातून कसा मार्ग काढावा हे सुचत नाहीये.

मराठीतील ग्रामीण लेखकांनी या वास्तवाला समजून घेत अतिशय समर्थपणे वास्तवावर आधारित गंभीर अशा कादंबऱ्यांचे लेखन या १९९० नंतरच्या काळात केलेले दिसून येते. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात सध्या वेगळे वळण घेतलेले दिसून येते. यामध्ये आपल्याला प्रकर्षाने असे जाणवते की, ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक प्रश्न आणि समस्या पुढे आणल्या जात आहेत. त्याचे माध्यम म्हणून कथा, कादंबऱ्या, कविता अशा काही साहित्य प्रकारांचा वापर केला जातो, असे दिसून येते. या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून हे प्रश्न पुढे आणले जातात. किंवा ती साहित्यकृती त्यासाठी जबाबदार ठरते आणि त्याचबरोबर त्या लेखकाचा संघर्ष जर त्या बदलाच्या दृष्टीने असेल तर ते अधिक पुढे येऊन त्यातून जे अन्याय किंवा समस्या पुढे येतात.

**संदर्भ ग्रंथ:**


१. ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, नागनाथ कोतापल्ले व इतर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन सप्टेंबर २००१.
२. ग्रामीण साहित्य आणि वास्तव (डॉ. द. ता. भोसले गौरवग्रंथ), संपा. डॉ. कृष्णा इंगोले, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी २०११.
३. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य, (प्रा.डॉ. कैलास सार्वेकर स्मृती-गौरवग्रंथ) संपा. डॉ. लीलावती देवरे , डॉ. शारदा मोरे, डॉ राहुल पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, डिसेंबर.
४. ग्रामीण साहित्य चळवळ: प्रेरणा व स्वरुप, डॉ. राजीव यशवंते, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २०१०.
५. ग्रामीण साहित्यः एक चिंतन डॉ. द. ता. भोसले, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००९.

६. साठोत्तरी मराठी वाङ.मयातील प्रवाह, संपादक. डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००७.
७. मनीषा क्षेमकल्याणी व आनंद क्षेमकल्याणी (संपादक) विषेशांक - ऑगस्ट - सप्टेंबर, २००० 'स्त्रग्धरा'-रंगनाथ पठारे.
८. लेखक आणि माणूस एक मित्र: श्री. ना. पेंडसे.
९. कुलकर्णी वा. ल.: 'हरिभाउंची सामाजिक कादंबरी'
१०. गाडगीळ गंगाधर: 'साहित्याचे मानदंड'